**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार**

---

तक्रार क्रमांक- ८१९/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| गजानन नाथा वाघोले | अव्वल कारकून, अभिलेख कक्ष संकलन पुणे. | तहसिलदार ( अभिलेख कक्ष),पुणे. |

(निर्णय दि. १९.०५.२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १५.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. या अर्जाद्वारे तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्रमांक ६३८०/२०२३/ पुणे या द्वितीय अपिलाची सुनावणी सूचना मिळाली नसल्याने व मी प्रकल्पग्रस्त असल्याने सदर प्रकरणाची सुनावणी घेऊन सहकार्य करावे अशी विनंती केली आहे.

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील क्रमांक ६३८०/२०२३/ पुणे याप्रकरणी आयोगाने दिनांक २४.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले आहेत. या सुनावणीस अपील आर्थिक व उत्तरवादी गैरहजर आहेत. सदर प्रकरणी अपीलार्थी गैरहजर असल्याने आयोगाने द्वितीय अपील निकाली काढण्याचे आदेश पारित केले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये आयोगाने सुनावणी घेऊन पारित केलेल्या द्वितीय अपील प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्याची तरतूद नसल्याने. तक्रारदार यांची विनंती मान्य करता येत नाही.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -८१९/२०२५/पुणे जावक क्र- 2510 दिनांक- 1/6/2026